**सी.एन.आर.नं.एमएचएसआय ०७—०००५७९—२०१५**

**नि.दि.मु.क्र. १२६/२०१५ मधील नि.क्र. ५१ ते नि.क्र. ५३ वरील संयुक्तिक आदेश**

प्रस्तुतचा दावा आज्ञार्थी मनाई हुकूम, कायमस्वरुपी मनाई हुकूम व वैकल्पिकरित्या कब्जा मिळण्यासाठी दाखल करण्यात आला आहे.

०२. प्रस्तुतचे अर्ज प्रतिवादी क्र. १ याने प्राथमिक मुद्दा निश्चित होवून मिळणेकरीता दाखल केलेले आहेत. तिनही अर्जातील मागण्या हया सारख्याच स्वरुपाच्या असल्याने अर्जांची निर्गती एकत्रितपणे करण्यात येत आहे. अर्जातील सदर प्रतिवादीचे थोडक्यात असे कथन आहे की, वादीने न्यायालयाची दिशाभूल करुन व न्यायालयाच्या आदेशाचा भंग करुन तथाकथित हमीपत्र दाखल केलेले आहे. हमीपत्र म्हणजे लेटर ऑफ गॅरेन्टी असते. ती योग्य त्या मुद्रांकावर व न्यायालयाने आदेश केलेल्या रक्कमेवर आधारित असणे आवश्यक आहे. परंतु, तशी ती द्यावी लागू नये व सदर हमीपत्राची अंमलबजावणी होवू नये या एकमेव कारणासाठी वादीने न्यायालयाची दिशाभूल करुन तथाकथित हमीपत्र दाखल केलेले असल्याने कायद्याने ते हमीपत्र नाही याबाबत प्राथमिक मुद्दा काढून त्याचा निर्णय प्रथम देण्यात यावा. तसेच दाव्यातील परिच्छेद क्र. १८(२) व १८(३) मध्ये वादीने प्रतिवादी क्र. १ व २ यांच्याविरुध्द केलेल्या मागण्या लक्षात घेता त्या कायद्यास धरुन नसल्यामुळे दावा कायद्याने चालण्यास पात्र नाही. सबब त्याबाबत प्राथमिक मुद्दा निश्चित करण्यात येवून त्याचा निर्णय प्रथम देण्यात यावा. इत्यादी सर्व बाबी नमूद करुन तिनही अर्ज मंजूर करण्याची विनंती सदर प्रतिवादीने केली आहे.

०३. वादीने नि.क्र. ५१ ते नि.क्र. ५३ करीता नि.क्र. ६० व नि.क्र. ६८ वर आपले म्हणणे सादर केलेले असून; अर्जांना आक्षेप नोंदविला आहे. वादीचे थोडक्यात असे म्हणणे आहे की, अर्ज खोटे व खोडसाळ असून, कायदेशीर नाहीत. वादीने न्यायालयाची कोणतीही दिशाभूल केलेली नाही अगर न्यायालयाच्या आदेशाचा कसलाही भंग केलेला नाही. वादीने न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे हमीपत्र दाखल केलेले असून; ते योग्य व बरोबर आहे. तशी न्यायालयाने खात्री करुनच ते स्वीकृत केलेले असल्याने त्याबाबत आता प्रतिवादीस कोणतीही हरकत उभारता येणारी नाही. त्यामुळे हमीपत्राबाबत प्राथमिक मुद्दा काढण्याची प्रतिवादीची विनंती

बेकायदेशीर व गैरलागू असल्याने व तशी कोणतीही कायदेशीर तरतूद नसल्याने नि. क्र. ५१ वरील अर्ज नामंजूर करण्यात यावा. नि.क्र. ५२ व नि.क्र. ५३ वरील अर्जात प्रतिवादी म्हणतो त्याप्रमाणे प्राथमिक मुद्दा काढण्याची कोणतीही तरतूद नाही. वादीने दाव्यात केलेल्या विनंत्या हया योग्य आणि कायदेशीर आहेत. अर्ज नैसर्गिक न्यायतत्त्वाच्या विरुध्द आहेत. सबब नि.क्र. ५२ व नि.क्र. ५३ वरील अर्ज फेटाळण्यात यावेत. इत्यादी सर्व बाबी नमूद करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती वादीने केली आहे.

०४. उभयपक्षकारांतर्फे संपुर्ण युक्तिवाद ऐकला. अभिलेख व रोजनामा यांचे अवलोकन केले असता; नि.क्र. ०५ वरील तुर्तातूर्त ताकीद अर्जावर माझ्या पुर्वाधिका—यांनी प्रतिवादी क्र. १ व २ यांच्याविरुध्द वादग्रस्त मिळकतीची आहे ती परिस्थिती त्यांनी कायम ठेवावी असा अंतरिम एकतर्फा आदेश पारीत केला असल्याचे दिसून येत असून, वादीचा खटला खोटा आहे असे निष्पन्न झाले व त्यामुळे प्रतिवादी क्र. १ व २ यांचे काही नुकसान झाले तर ते नुकसान वादी भरुन देईल असे त्याने रुपये १,००,०००/— रक्कमेचे हमीपत्र द्यावे असे त्यास निर्देशित केलेले असल्याचे दिसून येते. त्या अनुषंगाने नि.क्र. ६२ वर वादीने सुधारित हमीपत्र दाखल करुन घेणेची न्यायालयाकडे विनंती केली असल्याचे दिसून येत असून, त्यावर माझ्या पुर्वाधिका—यांनी दि. २३/०८/२०१६ रोजी अर्ज मंजूर करुन नि.क्र. ६३ वरील हमीपत्र स्वीकारले असल्याचे दिसून येते. प्रथमदर्शनी नि.क्र. ६३ वरील हमीपत्र हे नि.क्र. ५ वरील तुर्तातूर्त ताकीद अर्जावरील माझ्या पुर्वाधिका—यांनी निर्गमित केलेल्या आदेशानुसार वादीने दिलेले असल्याचे दिसून येत नाही. तथापि, दाव्यातील वादीची प्रतिवादींविरुध्दची मुख्य मागणी ही हमीपत्राबाबतची नसून नि.दि. मु.क्र. १४२/२००३ या दाव्यातील वाटप प्रक्रियेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने व वादग्रस्त मिळकत गट क्र. १८अ या मिळकतीची कोणतीही हद्द ठराव मोजणी करुन घेवू नये आणि वादग्रस्त मिळकतीतील शांततामय कब्जेवहिवाटीच्या अनुषंगाने प्रतिवादी क्र. १ व २ यांनी वादीस हरकत करु नये याच्याशी संबंधीत आहे असे दिसून येते. सबब नि.क्र. ६३ वरील हमीपत्राच्या अनुषंगाने प्रतिवादी म्हणतो त्याप्रमाणे प्राथमिक मुद्दा निश्चित करण्याची कोणतीही आवश्यकता नाही.

**नि.दि.मु.क्र.१२६/२०१५ मधील**
**नि.क्र. ५१ ते नि.क्र. ५३ वरील**
**संयुक्तिक आदेश**

नि.क्र. ०५ वरील दि. १५/१०/२०१५ रोजीच्या आदेशाची वादीने १,००,०००/— रुपये रक्कमेचे हमीपत्र नियमानुसार देवून पुर्तता करणे आवश्यक आहे ही बाब खरी आहे. तथापि; वादीने तसे हमीपत्र अभिलेखावर दिलेले नाही म्हणून मुळ दावा कायद्याने चालण्यास पात्र होत नाही असे म्हणता येणार नाही अथवा त्या निष्कर्षापर्यंत प्रथमदर्शनी प्रकरणातील आजच्या स्थितीस पोहोचता येत नाही. त्यामुळे नि.क्र. ५१ वरील अर्ज नामंजूर करावा लागेल.

०५. नि.क्र. ५२ व नि.क्र. ५३ वरील अर्जातील प्रतिवादीची मागणी पाहता; दाव्यातील परिच्छेद क्र. १८(२) व १८(३) वर वादीने मागितलेल्या दादी हया कायद्यास धरुन नसल्यामुळे दावा चालण्यास पात्र नाही याबाबत प्राथमिक मुद्दा निश्चित करुन त्याचा निर्णय प्रथम देण्यात यावा याच्याशी निगडित आहे. वादपत्रातील परिच्छेद क्र. १८(२) मध्ये 'प्रतिवादी नं.१ व २ यांनी मालवण येथील मे. दिवाणी न्यायाधीश यांचे कोर्टातील रे.दि.मु.नं. १४२/२००३ मधील वाटप प्रक्रीयेची अंमलबजावणी करुन घ्यावी अशी त्यांना आज्ञापक ताकीद व्हावी.' व परिच्छेद क्र. १८(३) मध्ये 'प्रतिवादी नं. १ व २ यांनी मालवण येथील मे. दिवाणी न्यायाधीश यांचे कोर्टातील रे.दि.मु.नं. १४२/२००३ मधील वाटप प्रक्रीयेची अंमलबजावणी केल्याशिवाय दावा मिळकत अनु नं. १ म्हणजेच १८ अ ची कोणतीही हद्द ठराव मोजणी करुन घेवू नये अशी त्यांना ताकीद व्हावी.' अशा मागण्या वादीने केलेल्या असल्याचे दिसून येते. वादकथनानुसार, कायदेशीर प्रक्रिया पार न पाडता प्रतिवादी क्र. १ व २ हे पुर्वी झालेल्या चुकीच्या नकाशाच्याआधारे गट क्र. १८ अ ची हद्द ठराव मोजणी करुन घेण्याच्या प्रयत्नात आहेत. त्या अनुषंगाने नि.दि.मु.क्र. १४२/२००३ या दाव्यातील वाटप प्रक्रियेची अंमलबजावणी करुन घेण्याची प्रतिवादी क्र. १ व २ यांचेविरुध्द वादीने आज्ञार्थी ताकीद हुकूम मिळणेची मागणी केलेली दिसून येते. प्रतिवादीने कैफियत दाखल करुन वादकथने नाकारलेली असल्याचे दिसून येते. वाद—प्रतिवादकथने पाहता; प्रस्तुतकामी वादी आणि प्रतिवादी यांच्यातर्फे सखोल मौखिक व लेखी पुरावा घेवून गुणवत्तेवर दाव्याची अंतिम निर्गती करणे उचित होणार आहे. कायद्यातील ही सर्व मान्य बाब आहे की,

कायदा व तथ्याचा मिश्रप्रश्न  प्राथमिक मुद्दा म्हणून चालविण्यात येत नाही. वाद—प्रतिवादकथने पाहता; वादपत्रातील  परिच्छेद क्र. १८(२) व १८(३) यामधील वादीने केलेल्या मागण्यांवरुन कायदा व तथ्याचा मिश्रप्रश्न उपस्थित होत असल्याने प्रतिवादी म्हणतो त्याप्रमाणे प्राथमिक मुद्दा निश्चित करण्याची याकामी कोणतीही आवश्यकता नाही. सबब नि.क्र. ५२ व नि.क्र. ५३ वरील अर्ज देखील वरील संपूर्ण विवेचनावरुन नामंजूर करावे लागतील. करीता खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येतो.

## आदेश

नि.क्र. ५१ ते नि.क्र. ५३ वरील अर्ज नामंजूर करण्यात येतात.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित केला.)

सही/—

दिनांक :—०१ ऑगस्ट २०१८ (आर.आर.काळे)
ठिकाण :—मालवण. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर मालवण.